॥ बहु असोत सुंदर ॥

गायिकाः ज्योत्स्ना भोळे
गीतः श्री. कृ. कोल्हटकर

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ धृ. ॥

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणें
अटकेवरि जेथील तुरंगिं जल पिणें
तेथ अडे काय जलाशयनदांविणें?
पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा ॥ १ ॥

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें
सद्भावांचींच भव्य दिव्य आगरें
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळिं नुरे
रमणीची कूस जिथें नृमणिखनि ठरे
शुद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा गृहा ॥ २ ॥

नग्न खड्ग करिं, उघडे बघुनि मावळे
चुतुरंग चमूचेंही शौर्य मावळे
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले
भासति शतगुणित जरी असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा ॥ ३ ॥

विक्रम वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म राजकारण समवेत चालती
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ ४ ॥

गीत मराठ्यांचें श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरीं ठसो

वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्ममर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा ॥ ५ ॥